**.ठळक बातम्या**

- प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिलीत कर्तव्य पथ इथल्या संचलनाची तयारी पूर्ण / राजधानी दिल्लीसह देशात सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था

- प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो यांचं पारंपरिक मानवंदनेनं स्वागत

- महाराष्ट्रात एसटीची भाडेवाढ आजपासून लागू

- ज्येष्ठ साहित्यिक न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या निधनाबद्दल मान्यवरांनी व्यक्त केलं दुःख

**आणि**

- मुंबई दहशतवादी आरोपी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यासह देशभर सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. नवी दिलीत कर्तव्य पथ इथं प्रजासत्ताक दिनानिमित्त उद्या होणार असलेल्या संचलनाची तयारी पूर्ण झाली आहे. संविधान स्वीकृतीची ७५ वी वर्षपूर्ती आणि लोकसहभाग यावर उद्याच्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांमध्ये भर देण्यात आला आहे. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो उद्याच्या संचलन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. भारताच्या सशस्त्र दलांसोबत इंडोनेशियाची १६० सदस्यीय संचलन तुकडी आणि १९० सदस्यीय बँड पथक या संचलनात सहभागी होणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलन सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी सकाळी राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं पुष्पहार

अर्पण करतील.नंतर कर्तव्य पथावर सशस्त्र दलांसह विविध पथकांच्या शानदार संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू स्वीकारतील. येत्या २९ जानेवारी रोजी विजय चौक इथं होणाऱ्या बीटिंग द रिट्रीट सोहळ्याने प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांची सांगता होणार आहे.

दरम्यान, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियंतो यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवनात आज औपचारिक स्वागत केलं. यावेळी सुबियंतो यांना गार्ड ऑफ ऑनरनं सन्मानित करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी आणि सुबियंतो दोन्ही देशांमधले परस्पर संबंध आणि द्विपक्षीय हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. या चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होणार आहेत.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या मुख्य सोहळ्यात पोलिस, गृहरक्षक दल, अग्निशमन, आणि नागरी सेवांसह इतर सुरक्षा सेवांमधल्या ९४२ कर्मचाऱ्यांना विविध पदकं प्रदान करण्यात येणार आहेत. यापैकी, ९५ कर्मचाऱ्यांना आपल्या अतुलनीय शौर्याबद्दल शौर्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार आहे. १०१ कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदकं तर ७४६ कर्मचाऱ्यांना उल्लेखनीय सेवा पदकं बहाल केली जाणार आहेत. नांदेड जिल्हा पोलीस दलातील दोन कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात येणार आहे. नांदेड पोलीस नियंत्रण कक्षातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय अंबादासराव जोशी आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल दिलीप भोजूसिंग राठोड या कर्मचाऱ्यांना पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झालं आहे.

**<><><><>**

प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी होणार असलेल्या संचलनात सहभागी राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, आदिवासी अतिथी आणि चित्ररथ कलाकारांशी प्रधानमंत्र्यांनी आज अनौपचारिक संवाद साधला. राष्ट्रीय एकात्मता आणि विविधतेवर यावेळी त्यांनी भर दिला. संचलन सोहळ्यातल्या सहभागींनी 'एक भारत श्रेष्ठ भारत' संकल्पनेला बळकटी देण्यासाठी निरनिराळ्या राज्यातल्या जनतेशी संवाद साधण्याचं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. त्यांच्या भाषणाचं थेट प्रसारण होणार असल्यानं, आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज, संध्याकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होईल.

राष्ट्रपतींच्या भाषणानंतर त्याचा इंग्रजी अनुवाद आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन प्रसारित केला जाईल. साडेनऊ वाजता आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित केला जाईल.

<><><><><>

आज राष्ट्रीय मतदार दिन. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तानं जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस भारताच्या चैतन्यशील लोकशाहीचा उत्सव साजरा करण्याचा आणि प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सक्षम करण्याचा आहे, अशा शब्दात मोदी यांनी समाज माध्यमांच्या द्वारे जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**होल्ड बाईट..प्रधानमंत्री**

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसच्या भाडेदरात आजपासून १४ पूर्णांक ९५ शतांश टक्के वाढ करण्यात आली आहे. हकिम समितीने निश्चित केलेल्या सुत्रानुसार ही भाडेवाढ करण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यानुसार साध्या बसचं भाडं ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी ११ रुपये, जलद सेवा बससाठी ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी ११ रुपये, रात्र सेवा बस ११ रुपये, निम आराम १५ रुपये, विनावातानुकूलीत शयन आसनी १५ रुपये, विनावातानुकूलीत शयनयान १६ रुपये, शिवशाही साठी ६ किलोमीटर प्रति टप्प्यासाठी १६ रुपये भाडे आकारण्यात येणार आहे.

एसटी ची भाडेवाढ ही जनतेची लूट असल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ विजय वडेट्टीवार यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना केली आहे. एसटी ही महाराष्ट्रातील जनतेची जीवनवाहिनी आहे. गरीब, मजूर, महिला, कामगारांना वेठीस धरणं योग्य नाही. त्यामुळे एसटी दरवाढ मागे घ्यावी, अशी वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. मराठीचे शिक्षक म्हणून कारकिर्दीला प्रारंभ करणारे चपळगांवकर यांनी, ७० च्या दशकात वकिली पेशात प्रवेश केल, आणि ८० च्या दशकात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पीठाचे न्यायाधीश म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९९९ साली न्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यानंतरही ते साहित्य क्षेत्रात अखेरपर्यंत सक्रीय राहिले. वर्धा इथं झालेल्या ९६ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष

होते. माजलगाव इथं झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनासह विविध साहित्य संमेलनांची अध्यक्षपदं त्यांनी भूषवली.

अभिरुचीयुक्त आणि अभ्यासपूर्ण लेखनासाठी ओळखले जाणारे न्यायमूर्ती चपळगांवकर यांनी अनंत भालेराव-काळ आणि कर्तृत्व, स्वामी रामानंद तीर्थ- कर्मयोगी संन्यासी, कहाणी हैदराबाद लढ्याची, कायदा आणि माणूस, विधीमंडळ आणि न्यायसंस्था, मनातली माणसे, संस्थानी माणसे, हरवलेले स्नेहबंध, अशी अनेक पुस्तकं लिहीली. सामाजिक मुद्यांवर परखड भाष्य करतानाच ललित लेखनातून नवोन्मेषाला हळुवारपणे संस्कारित करण्याची ताकद त्यांच्या लेखणीत होती. मराठवाडा साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार, अमेरिकेतल्या महाराष्ट्र फाऊंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार, अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं. महाराष्ट्र ज्ञान महामंडळानं, चपळगांवकर यांची समग्र माहिती देणाऱ्या एका संकेतस्थळाचं नुकतचं लोकार्पण केलं आहे. चपळगांवकर यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

न्यायमूर्ती चपळगावकर यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. चपळगावकर यांच्या निधनानं एक चिंतनशील साहित्यिक, महाराष्ट्र सुपुत्राला आपण मुकलो आहोत. अशी भावना मुख्यमंत्र्यांनी शोकसंदेशात व्यक्त केली आहे. सामाजिक मुद्यांवर परखड भाष्य करणारा कृतीशील विचारवंत हरपला आहे, त्यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाचं निधन ही महाराष्ट्राच्या साहित्यिक, सामाजिक, वैचारिक चळवळीची हानी असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. एक सिद्धहस्त साहित्यिक आपल्यातून निघून गेला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

<><><><><>

मुंबई दहशतवादी हल्ल्यातला महत्त्वाचा आरोपी तहव्वूर राणा याचा भारताकडे प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला आहे. राणा यानं भारताकडे प्रत्यार्पण करण्याविरोधात दाखल केलेली पुनर्विचार याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे. या हल्ल्यातला मुख्य आरोपी डेव्हिड हेडली याचा राणा हा जवळचा सहकारी आहे. अमेरिकेच्या कनिष्ठ न्यायालयानं राणाच्या प्रत्यार्पणाच्या आदेशाला मान्यता दिल्यावर राणा यानं वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, राणासाठी ही अखेरची कायदेशीर संधी उपलब्ध असल्यानं तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पण प्रक्रियेला आता गती मिळणार आहे.

<><><><><>

पुरुषांच्या हॉकी इंडिया लीग स्पर्धेत आज तामिळनाडू ड्रॅगन्सचा सामना टीम गोनासिका यांच्यासोबत होणार आहे. तर हैदराबाद तुफान्सची लढत यूपी रुद्रा यांच्यासोबत होणार आहे. सध्या गुणतालिकेत  तामिळनाडू ड्रॅगन्स १७ गुणांसह पहिल्या स्थानावर, तर हैद्राबाद तुफान १४ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.

<><><><><>

अवैध आर्थिक व्यवहार प्रतिबंध कायद्या अंतर्गत सक्तवसुली संचलनालयानं मुंबई आणि जयपूर मध्ये  मिळून १३ ठिकाणी छापे टाकले. प्लॅटिनम हर्न या खाजगी कंपनीमार्फत राबवल्या जाणाऱ्या फसव्या गुंतवणूक योजना उघडकीस आल्यामुळे हे छापे टाकण्यात आले.

//<><><><><>//